**सत्र खटला क्र. ५०/२०२१**
**सरकार वि. दामोदर**
**नि.क्र. ५१**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी.</u>**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| नांव | — **रमेश बाबन घोगरे** |
| वय | — ५८ वर्ष |
| कामधदां | — पोलीस हवालदार पोलीस मुख्यालय अकोला |
| राहणार | — अकोला, ता. जि. अकोला. |

-------------------------------------------------------------------------------------

**<u>सरकार पक्षातर्फे सरतपास श्री. ए. ओ. गोदे, सहाय्यक सरकारी वकील यांचे मार्फत—</u>**

**१.** दिनांक ०७.०५.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन, पातुर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी २०.१५ वाजता रामदास राउत हे पोलीस स्टेशनला आले. त्यांनी सांगितले की, त्यांचा मोठा भाउ दामोदर किसन राउत व त्यांची पत्नी घरात ठेवलेले लोखंडी कपाटातील सामान घेवून जात आहे व त्यांची पत्नी शांताबाई प्रतिभा हीस मारहाण करीत आहे. त्यावरुन गुल्हाने, नावकार, महल्ले, मी स्वत:, शिदे मेजर आणि एलपीसी श्रीमती पोले असे सरकारी वाहनाने घटनास्थळी गेलो व रामदास राउत यांच्या घरी ठेवलेल्या लोखंडी कपाटाची पाहणी केली. पाहणी करीत असतांना तेवढयात कल्लाहल्ला करुन दामोदर किसन राउत, त्यांची पत्नी शांताबाई, मुलगा धिरज, मुलगी इशा, प्रगती, वैशाली व जागृती यांनी कपाटाची पाहणी करीत असतांना सरकारी कामात अडथळा आणला. लेडीज कॉन्स्टेबल पोले यांना वरील लोकांनी खाली पाडून मारले. ती गरोदर असल्याने मी, शिंदे आणि महल्ले तिला वाचविण्यासाठी गेलो असता तेथे वरील मुलींनी व तिच्या आईने धक्काबुक्की करुन मला व शिंदे मेजरला व महल्ले साहेबांना वैशाली व इशाने बोखरले त्यामुळे पायातून रक्त निघाले. नंतर आम्ही सरकारी बळाचा वापर करुन दामोदर व त्यांना सरकारी गाडीत बसून घेवून जात असतांना धीरज राउत, शांताबाई राउत, इशा, प्रगती, जागृती, वैशाली यांनी पोलीसांना भडवे हो मादरचोद, तुम्हाला आम्ही खोटया गुन्हयात फसवून टाकू, माझी मुलगी वकील आहे अशा प्रकारे शिवीगाळ केली त्यामुळे आम्ही दामोदर राउत यांना घेवून गेलो. त्यानंतर महल्ले साहेबांनी फिर्याद दिली. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. मी आरोपींना ओळखतो.

आज दामोदर राउत न्यायालयात हजर आहे.

सरतपास समाप्त.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री ठोकळ यांच्या मार्फत सुरु —</u>**

**२.** असे काही घडले नाही की, सर्व आरोपींनी एका लाईनमध्ये उभे राहून एका आवाजात शिव्या दिल्या. त्या दिवशी माझे पोलीस स्टेशनमध्ये कामकाज चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या बाबत माझी शहरात डयुटी लागली नव्हती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, घटनास्थळी आम्ही शांतता राखण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी दंगल चालू आहे अशी माहिती आमच्या पोलीस स्टेशनला नव्हती. रामदास किसन राउत यांनी पोलीस स्टेशनला येवून माहिती दिली होती की घटनास्थळी दंगल चालू आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, आम्ही घटनास्थळी गेलो तेव्हा रामदास राउत व त्यांच्या कुटुंबियांविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नव्हता. हे म्हणणे बरोबर आहे की आम्ही सगळयाच गुन्हयांमध्ये प्रथम खात्री करण्यासाठी घटनास्थळावर जात नाही. आम्ही घटनास्थळावर गेल्याबरोबर रामदासच्या बायकोला दवाखान्यात नेले नाही. केवळ घटनास्थळाची पाहणी कली. आम्ही घटनास्थळाची पाहणी करुन आम्ही पंचनामा केला. पंचनामा महल्ले साहेबांनी केला. घटनास्थळ पंचनाम्यावर पंचांच्या सहया आहेत परंतु त्यांची नांवे मला आठवत नाहीत. सर्व आरोपींना पोलीस स्टेशनला आणल्यानंतर रामदास व त्याच्या पत्नीला दवाखान्यात नेले होते. सर्व जख्मींना एकत्र वैद्यकीय तपासणीसाठी नेले होते. आम्ही एमएलसी साठी २०.१९ वाजता गेलो होतो. एमएलसी २१.०० वाजेपर्यत चालली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटे वैद्यकीय प्रमाणपत्र आणले.

**३.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दामोदर यांच्या ताब्यात असलेले घर आम्ही रामदासला देण्याचे कबूल कले होते म्हणून त्यासाठी बेकायदेशीर कारवाई केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी दामोदर याचे डिटेंन्शन बेकायदेशीर होते व त्याला बेकायदेशीररित्या मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या टीमने केलेले बेकायदेशीर कृत्य लपविण्यासाठी आम्ही रामदास कडून रात्री १०.३० वाजता खोटा रिपोर्ट घेतला आणि खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी

आजही जाणीवपूर्वक खोटी साक्ष दिली.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

दि. ०७.०४.२०२६

सही/—

(एम.एस.भदाणे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला